खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – १२/०१/२०१८

## प्रेसनोट

## अंमली पदार्थ विक्री करणा-या आरती महादेव मिसाळ टोळीकडुन एकशे दोन ग्रॅम हेरॉईन व दोन किलो पन्नास ग्रॅम चरससह बारा लाख ऐक्याऐंशी हजार पाचशे रुपयाचा माल हस्तगत टोळीतील सातजण जेरबंद

---

दिनांक – १५/१२/२०१७ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा पुणे चे पोलीस निरीक्षक श्री सुनिल दोरगे व त्यांचे पथकातील स्टाफने त्यांना मिळालेल्या माहीतीवरुन दुपारी ०३/१५ वा चे सुमारास एकबोटे कॉलनी रेणुका माता मंदिरसमोर घोरपडे पेठ पुणे या ठिकाणी छापा मारुन संशयीत आरोपी गोपीनाथ नवनाथ मिसाळ वय-२२ रा - इनामके मळा लोहीयानगर पुणे व हुसैन पापा शेख वय – २८ रा – जाकु क्लब सैय्यदअली चाळ रुम नं ११ सांताक्रुझ (पुर्व) मुंबई यांना पकडले होते त्यावेळी त्यांचे ताब्यातुन ६७ ग्रॅम ब्राऊन शुगर (हेरॉईन) जप्त करण्यात आले होते सदर गुन्हयामध्ये मुख्य आरोपी आरती महादेव मिसाळ , पुजा महादेव मिसाळ , निलोफर हयात शेख , रॉकिसिंग जालिंदरसिंग कल्याणी रा - रामटेकडी हडपसर पुणे, आयेशा ऊर्फ आशाबाई पापा शेख रा - सांताक्रुझ (पुर्व) मुंबई ६) जुलैखाबी पापा शेख रा - सदर व अजहर ऊर्फ चुहा हयात शेख रा - हरकानगर पुणे हे आरोपी फरार होते व ते पोलीसांना गुंगारा देत वेगवेगळया ठिकाणी लपुन राहत होते.

खडक पोलीस स्टेशन पुणे येथील अधिकारी व कर्मचारी गुन्हयाचा तपास करत असताना यातील संशयीत आरोपी अजहर ऊर्फ चुहा हयात शेख रा - हरकानगर पुणे यास दिनांक – १८/१२/२०१७ रोजी पकडले आहे इतर आरोपींचा पोलीस कसुन शोध घेत असताना पोलीस कर्मचारी सागर केकान व विशाल शिंदे यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की यातील संशयीत मुख्य आरोपी आरती मिसाळ ही तिचे इतर साथीदारासह काळे रंगाचे स्विफ्ट कारमधुन नगर रोड वाघोली या भागात फिरत आहेत अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीसांनी सापळा रचुन दिनांक – ०७/०१/२०१८ रोजी रेम्बो क्रॉसरोड समोर स्विफ्ट कार नं - एमएच१४/बीके६००२ मधुन यातील संशयीत आरोपी १) आरती महादेव मिसाळ रा - लोहीयानगर पुणे, २) पुजा महादेव मिसाळ रा - इनामके मळा लोहीयानगर पुणे ३) निलोफर हयात शेख रा - हरकानगर पुणे ४) रॉकिसिंग जालिंदरसिंग कल्याणी रा - रामटेकडी हडपसर पुणे यांना ताब्यात घेतले आहे त्यावेळी त्यांचे ताब्यातुन कारसह रोख रक्कम, सहा मोबाईल फोन साठ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा ऐवज हस्तगत करण्यात आलेला आहे. पोलीसांनी त्यांचेकडे बारकाईने सखोल तपास केला असता त्यांचेकडे ब्राऊन शुगर (हेरॉईन), चरस या अंमली पदार्थचा आणखी साठा असल्याची माहीती त्याचेकडुन प्राप्त झाली त्यानुसार पोलीसांनी तपास करुन आणखी **तेहतीस ग्रॅम त्यांचे ताब्यातुन ब्राऊन शुगर (हेरॉईन) व दोन किलो पन्नास ग्रॅम चरस असा माल हस्तगत केला आहे त्यांचेकडुन एकुण शंभर ग्रॅम ब्राऊन शुगर (हेरॉईन) व दोन किलो पन्नास ग्रॅम चरस असा सहा लाख रुपयाचा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आलेला आहे.**

वरील सर्व आरोपी हे संगणमत करुन संघटितरित्या अंमली पदार्थाची आपले ओळखीचे ग्राहकांना विक्री करत होते मुख्य आरोपी आरती महादेव मिसाळ हिने सदर व्यवसायातुन मिळालेल्या उत्पन्नातुन अनेक ठिकाणी प्लॅट व घर वाहने खरेदी केल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झालेली आहे. आरोपींच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेली रोख रक्कम, सोन्याचे दागिने व वाहने त्यांनी अंमली पदार्थाचे विक्रीतुन मिळालेल्या पैशातुन खरेदी केल्याचे उघडकीस आलेले आहे. **त्यांचेकडुन ब्राऊन शुगर (हेरॉईन) व चरस या अंमली पदार्थसह एक स्वीप्ट कार , एक ॲक्टिव्हा मोपेड, रोख रक्कम , सोन्याचे दागिने असा एकुण बारा लाख एक्याऐंशी हजार रुपयाचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.**

सर्व आरोपी पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे त्यांचेकडे उत्पन्नाचे काहीएक साधन नाही . आरोपी **आरती मिसाळ हिचेविरुध्द यापुर्वी खडक व पिंपरी पोलीस स्टेशन पुणे येथे ब्राऊन शुगर (हेरॉईन) व दारु विक्रीचे चार गुन्हे, पुजा मिसाळ हिचेविरुध्द पिंपरी पोलीस स्टेशन पुणे येथे ब्राऊन शुगर (हेरॉईन) विक्रीचा एक गुन्हा, निलोफर शेख हिचेविरुध्द खडक पोलीस स्टेशन पुणे येथे बेकायदेशीर सावकारी व्यवसाय केल्याबाबत एक गुन्हा तसेच रॉकीसिंग कल्याणी याचेविरुध्द वानवडी पोलीस स्टेशन पुणे येथे खुनाचा प्रयत्न व दंगा मारामारी असे दोन गुन्हे दाखल आहे.**

मा. अे. अेस. महात्मे जिल्हा न्यायाधिश ७ अतिरिक्त सत्र न्यायाधिश व विशेष न्यायाधिश एनडीपीएस न्यायालय पुणे यांचे न्यायालयात सर्व आरोपींना दिनांक – १२/०१/२०१८ रोजी हजर करण्यात आले होते त्यावेळी सरकारी वकील श्री विजय फरगडे यांनी आरोपींकडे अंमली पदार्थाचा साठा आहे त्याबाबत तसेच पाहीजे आरोपीबाबत सांताक्रुझ मुंबई येथे जावुन तपास करणे असल्याने त्यांची तपासकामी पोलीस कोठडी मिळण्याबाबत विनती केली होती सर्व आरोपींना दिनांक – १५/०१/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश मा. न्यायालयाने दिलेले आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. किशोर नाईक यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के, तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, अनंता व्यवहारे व तपास पथकातील कर्मचारी सागर केकाण, विशाल शिंदे सर्फराज शेख, विश्वनाथ शिंदे, राकेश क्षीरसागर, संदिप कांबळे, गणेश माळी, इम्रान नदाफ, अनिकेत बाबर, अशिष चव्हाण, महिला पोलीस कर्मचारी हेमा ढेबे, रेखा बांडे, राजश्री अंबिके, गौरी राजगुरु यांनी केलेली आहे.